# राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेसमोर

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**तक्रार क्र. १०५६/२०१८/बीड**
**(द्वितीय अपील क्र.५१७५/२०१७ मध्ये)**

श्रीमती सय्यद रहिमा मियामत : तक्रारदार
मु.गजाननगर,मोहम्मदीया मस्जीद,बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गटशिक्षणाधिकारी कार्यालय, पंचायत समिती,गेवराई,जि.बीड

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी
गटशिक्षणाधिकारी कार्यालय, पंचायत समिती,गेवराई,जि.बीड

**निर्णय**
**(सुनावणी दि. ०६.११.२०२३)**

तक्रारदार यांनी दि.०६.१०.२०१७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. "तक्रारदार यांनी खालीलप्रमाणे तक्रार केलेली आहे.

आयोगाचे आदेश असतानाही जन माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांनी कुठल्याही प्रकारचा पत्रव्यवहार केलेला नाही."सदर आदेशाची अंमलबजावणी केली नाही, अशी तक्रार करुन संबंधितावर कलम २०(१) (२) नुसार शिस्तभंग व दंडात्मक कार्यवाही करावी, अशी मागणी तक्रारदाराने केली आहे.

आयोगाने द्वितीय अपील क्र.५१७५/२०१७ मध्ये दि.२२.०३.२०१८ (निर्गमित दि.९/७/२०१८)रोजी खालील प्रमाणे आदेश दिलेले होते.

" प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम१९(१) व (२) नुसार अपिलकर्त्यास त्यांच्या दि.१६.१०.२०१७ रोजीच्या अपील अर्जावर सुनावणीसाठी नोंदणीकृत डाकेने नोटीस पाठवावी. आवश्यकतेनुसार जन माहिती अधिकारी यांचा लेखी खुलासा घ्यावा. माहिती देण्यास विलंबाबाबत कारणमिमांसेचा उहापोह सुनावणी निर्णयात करावा. सुनावणी दरम्यान अधिनियमतील तरतुदीनुसार देय असणारी माहिती उपलब्ध करुन देणे शक्य असल्यास ती सुनावणी दरम्यानच उपलब्ध करुन देऊन संबंधिताची स्वाक्षरी घ्यावी. तसेच माहिती उपलब्ध करुन देतांना ती साक्षांकित करुन देण्यात यावी. अधिनियमातील कलम१९(६)नुसार निर्णय पारित करुन त्याबाबतचे आदेश निर्गमि करावेत. आदेशाची प्रत अपिलार्थीस तात्काळ उपलब्ध करुन द्यावी.तसेच यासंदर्भातील अनुपालन अहवाल आयोगास ३० दिवसात सादर करावा."

सदर प्रकरणामध्ये यापूर्वी दि.१५.०६.२०२३रोजी सुनावणी घेण्यात आली होती.त्यामध्ये श्री.मसरे ए.एस (सेवा निवृत्त) गटशिक्षणाधिकारी उपस्थित होते.सुनावणीवेळी आयोगाने पारित केलेला आदेशाप्रमाणे कोणती कार्यवाही केली यासंदर्भात अभिलेखे / पुरावा ते सादर करु शकले नाहीत. त्यांनी सूचित केले की, ते सेवानिवृत्त झाले आहेत. सबब पुढील सुनावणीला श्री.एन.व्ही.सोनवणे विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती गेवराई जि.बीड यांना उपस्थित राहण्यासाठी कारणे दाखवा नोटीस दि.०३.०८.२०२३रोजी देण्यात आली. त्यांनी दि.१३.०९.२०२३रोजी आपला खुलासा आयोगाकडे सादर केला. त्यामध्ये त्यांनी दि.२२.०३.२०१८रोजी मा.राज्य माहिती आयोगाने व्दितीय अपील क्रमांक ५१७५/२०१७ मध्ये प्रथम अपीलांवर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्याविषयी निर्देश दिले, त्यानुसार श्री.एम.पी.तुरुकमारे तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी गेवराई यांनी दि.२२.१२.२०२०रोजीचे पत्रान्वये अपिलर्थी व मुख्याध्यापक विमल मंदिर प्राथमिक शाळा जायकवाडी वसाहत गेवराई,ता.गेवराई जि.बीड यांनी दि.३०.१२.२०२० रोजी वेळ १.०० वाजता गटशिक्षण कार्यालय,पंचायत समिती गेवराई येथे प्रथम अपीलावर सुनावणी ठेवण्यात आली आहे.त्या सुनावणीसाठी उपस्थित राहण्याविषयी कळविण्यात आले,त्याअनुषंगाने मुख्याध्यापक,विमल मंदिर प्राथमिक शाळा जायकवाडी वसाहत गेवराई जि.बीड यांनी ती माहिती गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे दिली व त्यांनी दि.३०.१२.२०२० रोजीच्या पत्रान्वये अपिलर्थी यांनी दिली. परंतु दि.३०.१२.२०२०रोजीच्या सुनावणीच्या वेळी मुद्दा

क्र.१ ची मागितलेली माहिती न देता ७/१२ चा उतारा देण्याकरिता एक संधी देण्यात यावी असे प्रथम अपील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी वकील मार्फत बोलून दाखविले होते.त्यामुळे दि.८.०३.२०२१ रोजीच्या पत्रान्वये अर्धवट राहीलेले दस्तऐवज पुरविण्यात आले आणि त्यांनी तसा पुरावा खुलासासोबत सादर केला आहे.

श्री.एन.व्ही.सोनवणे विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती गेवराई जि.बीड आजच्या सुनावणीस आयोगासमोर अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्यावेळी तक्रारदार यांनी यांनी कथन केले की, आयोगाच्या आदेशाप्रमाणे मला माहिती मिळालेली नाही.उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, श्री.एम.पी. तुरुकमारे तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी गेवराई जि.बीड दि.२२.१२.२०२० रोजी प्रथम अपील सुनावणीसाठी संबंधितांना नोटीस दिली प्रथम अपीलावर दि.३०.१२.२०२० सुनावणी घेतली,(तसेच दि.८.०३.२०२१रोजी तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.३०.१२.२०२०रोजी अर्धवट राहिलेले दस्तऐवज पुरविण्याबाबत पत्र दिलेले आहे,असे दिसून येते.) परंतु जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा घेतला किंवा कसेयाबाबतचा बोध होत नाही, त्यामुळे आयोग श्री.एम.पी. तुरुकमारे तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी अधिकारी पंचायत समिती गेवराई,जि.बीड (सध्या कार्यरत प्राथमिक विभाग,जिल्हा परिषद,बीड) यांना खुलासा सादर करण्यासाठी ३० दिवसाची मुदत देत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे अंतरिम आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

श्री.एम.पी. तुरुकमारे तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती गेवराई,जि.बीड (सध्या कार्यरत प्राथमिक विभाग,जिल्हा परिषद,बीड) यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात व्दितीय अपील क्रमांक ५१७५/२०१७ मधील आदेशानंतर केलेल्या संपूर्ण कार्यवाहीचा खुलासा व अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा, अन्यथा आपले काहीही म्हणणे नाही, असे गृहित धरुन आपल्या विरुध्द पुढील दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

( समीर सहाय )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

---

तक्रार क्र.१०५६/२०१८/बीड/एबीजे/जावक क्र. 19635 /२०२३ दिनांक : 26/12/2023
प्रत :- शिक्षणाधिकारी,प्राथमिक,जिल्हा परिषद,बीड यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव.